TITLE-CODE:- MAHMAR52789

# आपला मराठी टाइम्स

संपादक : अनिल राजाराम पवार    कार्यकारी संपादक: मुकेश आर्मा देवेंद्र    APLA MARATHI TIMES

वर्ष : १ ● अंक : १५ ● साप्ताहिक ● मुंबई ● भाषा : मराठी ● सोमवार : ८ ते १४ एप्रिल २०२४ ● पृष्ठ - ८ ● मुल्य : ६ रुपये

# विरोधकांना ब्लॅकमेल करण्याचे फडणवीसांचे षडयंत्र – काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची टीका

## सोमैयांनी फडणवीसांच्या कपटी राजकारणाचा बुरखा फाडला

**मुंबई (प्रतिनिधी)** भाजपने गेल्या १० वर्षात अत्यंत खालची पातळी गाठत खूनशी आणि कपटी राजकारण करुन विरोधकांना संपवण्याचे काम केले. महाराष्ट्रातील काँग्रेस, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांना सरकारी यंत्रणेला हाताशी धरून ब्लॅकमेल केले. भाजपच्या या खूनशी राजकारणावर काँग्रेस पक्षाने सातत्याने आवाज उठवला आणि आज अखेर सत्य समोर आले. विरोधकांना भ्रष्ट ठरवून बदनाम करण्याचे षडयंत्र रचणारा दुसरे कोणी नाही तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसच आहेत हे भाजपचे माजी खासदार किरीट सोमैया यांनीच उघड करत फडणवीसांच्या कपटी राजकारणाचा बुरखा टराटरा फाडला आहे, असे जळजळीत टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी शनिवारी केला. देवेंद्र फडणवीस यांच्या सांगण्यावरून आपण मातोश्रीचा भ्रष्टाचार बाहेर काढल्याचा दावा किरीट सोमैया यांनी काल, शुक्रवारी एका वृत्त वाहिनीशी बोलताना केला. सोमैयांच्या या विधानावरून पटोले यांनी फडणवीस यांना लक्ष्य केले. भाजपचे किरीट सोमैया हे विरोधी पक्षाच्या नेत्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप करायचे. ईडी, सीबीआय, इन्कम टॅक्स विभागाच्या मदतीने त्यांच्यावर कारवाई करावण्यास लावायचे. या ब्लॅकमेलिंगला कंटाळून अनेकांनी भाजपमध्ये प्रवेश केला. भाजपत




प्रवेश करताच त्यांना सन्मानाने संवैधानिक पदे दिली. या सर्व प्रकरणाचा सूत्रधार हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आहेत, त्यांच्या सांगण्यावरूनच आपण काम केले. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याविरोधातही कटकारस्थान करण्यास फडणवीस यांनीच आदेश दिले होते हे सोमैया यांनी उघड केल्याने देवेंद्र फडणवीस यांचा खरा चेहरा जनतेसमोर आला आहे. भ्रष्टाचाराच्या नावाखाली महाराष्ट्रात पद्धतशीरपणे एक रॅकेट चालवले गेले. हे रॅकेट चालवणारा खलनायक देवेंद्र फडणवीस आहेत हे आता लपून राहिलेले नाही, असा हल्लाबोल पटोले यांनी केला. महाराष्ट्राला एक मोठी राजकीय परंपरा लाभलेली आहे. या परंपरेला देवेंद्र फडणवीस यांनी काळीमा फासला आहे. विरोधकांना शत्रू समजून त्यांना बदनाम करणे, त्यांची राजकीय कारकिर्द संपवणे, खोटे आरोप लावून नाहक त्रास देणे हे सर्वांमागे फडणवीस यांचाच प्रताप होता. सोमैया यांनीच सर्व उघड केल्याने भारतीय जनता पक्षाचा भ्रष्टचाराविरोधातील लढाई ही केवळ विरोधकांना संपवण्यासाठी होती हे स्पष्ट दिसत आहे. त्यामुळे भ्रष्टाचाऱ्यांना सोडणार नाही पण त्यांना ब्लॅकमेल करुन भाजपत सन्मानाने प्रवेश देणार हाच त्यांचा राजकीय अजेंडा असल्याचे उघड झाले आहे. आता जनताच भाजपला घरी बसवून त्यांची जागा दाखवतील, असा इशाराही पटोले यांनी दिला आहे.

## निवडणूक प्रशिक्षण कार्यक्रमास गैरहजर

### अधिकारी व कर्मचाऱ्यांवर फौजदारी कारवाईचा बडगा – जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर

**मुंबई (प्रतिनिधी):** मुंबई उपनगर जिल्हा अंतर्गत लोकसभा निवडणूक २०२४ साठी जे नियुक्त अधिकारी व कर्मचारी निवडणूक प्रशिक्षण कार्यक्रमास गैरहजर राहिले आहेत, त्यांच्याविरुद्ध लोकप्रतिधीत्व अधिनियम १९५१ अंतर्गत फौजदारी कारवाईचा बडगा उचलण्यात येणार असल्याची माहिती मुंबई उपनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांनी दिली. मुंबई उपनगर जिल्हा अंतर्गत लोकसभा निवडणूक २०२४ साठी ५० हजार अधिकारी आणि कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून नियुक्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी निवडणूकविषयक विविध प्रकारच्या कामकाजा संदर्भातील ५ प्रशिक्षण कार्यक्रम झाले आहेत. या सर्व प्रशिक्षणांना संबंधित अधिकारी आणि कर्मचारी यांनी उपस्थित राहणे अनिवार्य असून गैरहजर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार लोकप्रतिधीत्व अधिनियम १९५१ अंतर्गत दंडात्मक फौजदारी कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांनी दिली. मुंबई उपनगर जिल्हा अंतर्गत लोकसभा निवडणूक २०२४ साठी सर्व नियुक्त अधिकारी आणि कर्मचारी यांनी नियोजित निवडणूक प्रशिक्षण कार्यक्रमास हजर राहणे अनिवार्य असून यासंदर्भातील आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी होईल याची दक्षता सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घ्यावी असे आदेश निवडणूक शाखेमार्फत निर्गमित करण्यात आले आहेत.

## पंतप्रधानांकडून सरकारी यंत्रणेचा गैरवापर – संजय राऊत यांचा आरोप

### निवडणूक आयोगाकडून कारवाईची मागणी



**मुंबई (प्रतिनिधी)** पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारी यंत्रणा आणि सरकारी पैशांचा वापर करत दौरे करत आहेत. निवडणुका जाहीर झाल्यानंतर अशा गोष्टींचा वापर करून प्रचार करणे म्हणजे आचारसंहितेचा भंग आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाने भाजपवर कारवाई करावी, अशी मागणी शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी सोमवारी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना केली. दरम्यान, महाराष्ट्रात आता जागावाटपावर कोणतीही चर्चा होणार नाही. आता कोणाला चर्चा करायची असेल तर २०२९ च्या निवडणुकीसाठी किंवा विधानसभेच्या निवडणुकीसाठी होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. राऊत यांच्या या भूमिकेमुळे ठाकरे गट सांगली आणि दक्षिण मुंबईची जागा काँग्रेसला सोडण्यास तयार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मुंबई दौऱ्यावर होते. या दौऱ्यावरून राऊत यांनी आज मोदींवर निशाणा साधला. निवडणुकांची घोषणा झाल्यावर पंतप्रधान आणि कोणतेही मंत्री पदावर नसतात. ते सर्वसामान्य नागरिक आणि निवडणुकीतील उमेदवार असतात. त्यामुळे निवडणुकीतील त्यांचा खर्च पक्षाच्या खात्यात किंवा त्यांनी स्वत: करणे अपेक्षित असते. मात्र, भाजपकडून प्रचारासाठी सरकारी यंत्रणाचा वापर करण्यात येत आहे.

पान २ वर

# दशनाम गोसावी समाधी भूमीवर कचराकुंडीचे साम्राज्य : प्रशासनाचे दुर्लक्ष, गोसावी सेनेच्या वतीने निवेदन



**ब्राह्मणगाव :** दशनाम गोसावी समाज अंत्यविधी हा समाधी भूमी द्वारे करण्यात येत असतो. या समाधी भूमीची योग्य ती देखरेख जागेची स्वच्छता म.न.पा प्रशासना द्वारे केली जात असते. मात्र, ब्राह्मणगाव तालुका सटाणा येथील दशनाम गोसावी समाज समाधी भूमीवर संपूर्णत: कर्चय़ाचे मोठे मोठे ढीग पाहायला मिळत आहे.आजूबाजूच्या रहिवाशांनी येथे मोठ्या प्रमाणावर कचरा टाकून समाधी भूमीचे पावित्र्य नष्ट केल्याची चित्र दिसून येत आहे. गोसावी सेनेच्या वतीने संबंधित गावातील सरपंच ग्रामसेवक प्रशासकीय व्यक्तींना भेटून संबंधित समाधी भूमीच्या जागेवर वॉल कंपाऊंड करणे व स्वच्छता करणे या संदर्भात गोसावी समाज सेना वतीने संपर्क केला असून लवकरात लवकर वॉल कंपाऊंड व स्वच्छता झाली नाही. तर गोसावी सेनेच्या वतीने आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

# बारामतीत वंचितचा सुप्रिया सुळेंना पाठिंबा, पुण्यातून वसंत मोरे यांना उमेदवारी

**मुंबई (प्रतिनिधी)** वंचित बहुजन आघाडीने बारामती लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांना पाठिंबा जाहीर केला आहे. त्यामुळे बारामतीत सुप्रिया सुळे आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्यात सरळ लढत होणार आहे. वंचित बहुजन आघाडीने मंगळवारी रात्री उशीरा आपली लोकसभा उमेदवारांची तिसरी यादी जाहिर केली. ही यादी घोषित करताना वंचितने बारामती लोकसभा मतदारसंघात उमेदवार उभा न करण्याचा निर्णय घेतला आहे. याआधी वंचितने नागपूर आणि कोल्हापूर लोकसभा मतदारसंघात काँग्रेस उमेदवारांना पाठिंबा जाहीर केला आहे. दरम्यान, वंचितने पुण्यातून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे माजी नगरसेवक वसंत मोरे यांना उमेदवारी दिली आहे. मोरे यांनी काही दिवसांपूर्वी मनसेला अखेरचा जय महाराष्ट्र केला होता. त्यानंतर मोरे यांनी लोकसभा उमेदवारीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडे चाचपणी केली होती. मात्र, पुणे लोकसभेची जागा काँग्रेसला सुटल्यानंतर वसंत मोरे यांनी मुंबईत प्रकाश आंबेडकर यांची भेट घेतली. या भेटीनंतर वंचितने आज मोरे यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब केले. वंचितने नांदेडमधून अविनाश भोसीकर, परभणीतील बाबासाहेब उगले, छत्रपती संभाजीनगरमधून (औरंगाबाद) अफसर खान यांना तर शिरूरमधून मंगलदास बांदल यांना उमेदवारी जाहीर केली आहे. वंचितने लोकसभा निवडणुकीसाठी आतापर्यंत एकूण २५ उमेदवार घोषित केले आहेत.

# राष्ट्रवादीच्या चिन्हावर लढण्याचे पृथ्वीराज चव्हाण यांचे संकेत

**भाजपच्या उदयनराजेंच्या विरोधात चव्हाणांचे आव्हान?**

**मुंबई (प्रतिनिधी)** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांचे राजकीय विरोधक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी सातारा लोकसभा मतदारसंघाची निवडणूक पवार यांच्या पक्षाच्या चिन्हावर लढण्याचे संकेत सोमवारी एका खासगी वृत्त वाहिनीशी बोलताना दिले. शरद पवारांनी आदेश दिला तर मी लढायला तयार आहे, असे सांगत चव्हाण यांनी भाजपचे सातारामधील संभाव्य उमेदवार उदयनराजे भोसले यांच्याशी दोन हात करण्याची तयारी दर्शवली. पश्चिम महाराष्ट्रातील लोकसभा मतदारसंघांपैकी सातारा हा मतदासंघ शरद पवार यांच्या गटासाठी सुरक्षित मानला जातो. पक्षाने स्थापनेपासून सातारा आणि कराडची जागा जिंकली आहे. मतदारसंघ पुनर्रचनेपासून सातारा मतदारसंघावर पवारांचे वर्चस्व राहिले आहे. साताराचे मावळते खासदार श्रीनिवास पाटील यांनी प्रकृतीचे कारण पुढे करून लोकसभा निवडणूक लढविण्यास असमर्थता दर्शवली आहे. त्यामुळे शरद पवार सातार्‍यात तुल्यबळ उमेदवाराच्या शोधात आहेत. सध्या शरद पवार गटाकडून माजी मंत्री शशिकांत शिंदे, बाळासाहेब पाटील यांच्यासह जिल्हाध्यक्ष सुनील माने यांच्या नावाची चर्चा आहे. तथापि, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी नुकतीच कराड येथे पृथ्वीराज चव्हाण यांची भेट घेऊन बंद दाराआड चर्चा केली. त्यामुळे साताराचे संभाव्य उमेदवार म्हणून पृथ्वीराज चव्हाण यांचे नाव पुढे आले आहे. चव्हाण यांचे घराणे हे काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ राहिले आहे. मध्यंतरी काँग्रेस अध्यक्षांची नेमणूक आणि पक्ष संघटनेच्या मुद्द्यावरून काँग्रेसच्या २३ नेत्यांनी सोनिया गांधी यांना पत्र पाठवले होते. या २३ नेत्यांमध्ये पृथ्वीराज चव्हाण यांचा समावेश होता. तेव्हा चव्हाण यांच्यावर पक्ष नेतृत्व नाराज असल्याची चर्चा होती. तथापि, मधल्या काळात पुलाखालून बरेच पाणी वाहून गेल्याने आता पृथ्वीराज चव्हाण यांचे नाव लोकसभेसाठी चर्चेत आले आहे. या पार्श्वभूमीवर वृत्तवाहिनीशी बोलताना चव्हाण म्हणाले, मला जर त्यांनी (शरद पवारांनी) आदेश दिला तर माझी सातारा लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढायची तयारी आहे. पण हा निर्णय शरद पवारांचा आहे. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या कर्मभूमीत जातीयवादी विचार येणार नाहीत यासाठी शरद पवार आणि आम्ही कटीबद्ध आहोत. दरम्यान, १९९९ च्या लोकसभा निवडणुकीत कराड मतदारसंघातून पृथ्वीराज चव्हाण यांना श्रीनिवास पाटील यांच्याकडून पराभव पत्करावा लागला होता. त्यानंतर काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने आघाडी करून लोकसभा निवडणूक लढविल्याने पृथ्वीराज चव्हाण यांना १९९९ नंतर लोकसभा लढविण्याची संधी मिळाली नाही. आता तब्बल २५ वर्षानंतर पृथ्वीराज चव्हाण लोकसभा निवडणूक लढविण्याची शक्यता आहे. अर्थात तत्पूर्वी त्यांना राष्ट्रवादीच्या शरद पवार गटात प्रवेश करावा लागेल. याआधी वर्धा जिल्ह्यातील आर्वीचे काँग्रेसचे माजी आमदार अमर काळे यांनी शरद पवार गटात प्रवेश केल्यानंतर त्यांना वर्धा लोकसभा मतदारसंघाची उमेदवारी देण्यात आली आहे.

## नोटिस

टॅक्सी क्रमांक MH01BA/3778
टॅक्सी परवाना नं.७१/१२१
ओनर : कलाबाई बजीरंग धनावडे
५७ भंडारी स्ट्रीट रूम नंबर २२,दुसरा माळा,
तबेला बिल्डिंग मुंबई- ४०० ००४.
मुलगा : दिपक बजीरंग धनावडे
२९ किका स्ट्रीट गुलालवाडी रंगवाला बिल्डिंग पहिला माळा,
रूम नंबर ३ गिरगाव,मुंबई - ४०० ००४.

सदर टॅक्सी दिपक बजीरंग धनावडे यांच्या नावे परवाना ट्रान्सफर करण्यात येत आहे. कोणाची काही हरकत असेल तर आरटीओ ताडदेव यांच्याशी संपर्क करावे.धन्यवाद

# भिवंडीतून बाळ्यामामा म्हात्रे यांना उमेदवारी, शरद पवार गटाची दुसरी यादी जाहीर

**मुंबई (प्रतिनिधी)** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने गुरुवारी लोकसभा उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली. त्यानुसार भिवंडीतून सुरेश उर्फ बाळ्यामामा म्हात्रे यांना तर बीडमधून बजरंग सोनवणे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. बहुप्रतिक्षित सातारा लोकसभेच्या उमेदवारीबाबत शरद पवार गटाने अद्याप निर्णय घेतलेला नाही. भिवंडी लोकसभा मतदारसंघावरून काँग्रेस आणि शरद पवार गटात रस्सीखेच होती. भिवंडी लोकसभा मतदारसंघ काँगेसला मिळावा, अशी मागणी नेत्यांनी केली होती. याशिवाय भिवंडीतील स्थानिक पदाधिकार्यांनी मतदारसंघ काँग्रेसकडेच राहावा म्हणून काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांची भेट घेतली होती. मात्र, काँग्रेसच्या प्रयत्नांना यश आले नाही. कोकण आणि मुंबई महानगर प्रदेशात भिवंडी ही एकमेव जागा शरद पवार गटाच्या वाट्याला आली आहे. शरद पवार गटाने बीडमधून बजरंग सोनवणे यांना उमेदवारी दिली आहे. येथून दिवंगत विनायक मेटे यांच्या पत्नी ज्योती मेटे शरद पवार गटाकडून निवडणूक लढविण्यास इच्छुक होत्या. त्यासाठी त्यांनी सरकारी नोकरीतून स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली होती. तसेच त्यांनी अनेकदा शरद पवार यांची भेट घेतली होती. मात्र, शरद पवार गटाने अखेर बजरंग सोनवणे यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. सोनवणे यांच्याकडे कार्यकर्त्यांचा मोठा संच आहे. सोनवणे यांनी २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत बीडमधून प्रीतम मुंडे यांच्या विरोधात पाच लाखाहून अधिक मते घेतली होती. या पार्श्वभूमीवर शरद पवार गटाने पुन्हा सोनवणे यांच्यावर विश्वास व्यक्त केला आहे. शरद पवार यांच्या गटाने आतापर्यन्त एकूण सात उमेदवार घोषित केले आहेत. त्यामुळे राष्ट्रवादीच्या सातारा, माढा आणि जळगाव जिल्ह्यातील रावेर या तीन लोकसभा मतदारसंघातील उमेदवारांची प्रतीक्षा कायम आहे.

# पंतप्रधानांकडून सरकारी यंत्रणेचा गैरवापर - संजय राऊत यांचा आरोप

**पान १ वरून**

हा आचारसंहितेचा भंग आहे. त्यामुळे भाजपवर कारवाई करण्याची गरज आहे, असे राऊत म्हणाले. मोदी यांचा एक दौरा सुमारे २५ कोटी रुपयांचा असतो. त्यामुळे आचरसंहिता फक्त विरोधी पक्षांसाठीच आहे का? असा सवाल संजय राऊत यांनी केला. काँग्रेस, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), तृणमूल काँग्रेस अशा पक्षांना नोटीस पाठवण्यात येते. मात्र, नरेंद्र मोदींना कोणतीही नोटीस पाठवण्यात येत नाही, याकडेही राऊत यांनी लक्ष वेधले. भ्रष्टाचार्यांना सोडणार नाही, त्यांच्यावर कारवाई करणारच, असे मोदी यांनी मेरठ येथील सभेत सांगितले. हा मोठा विनोद ते दररोज करत आहेत. जॉनी लिवर नंतर हे गुजरातचे लिवर जनतेचे मनोरंजन करत आहे, असा टोलाही राऊत यांनी लगावला. भ्रष्टाचाऱ्यांना सोडणार नाही, असे मोदी म्हणतात आणि त्यांच्या आजूबाजूलाच १० भ्रष्टाचारी नेते बसलेले दिसतात. देशातील सर्वात भ्रष्टाचारी पक्ष म्हणजे भाजप आहे. निवडणूक रख्यांबाबत त्यांनी अद्याप प्रतिक्रिया दिलेली नाही. हिंमत असेल तर या निवडणूक रोख्यांच्या भ्रष्टाचारावर बोला, असे आव्हानही त्यांनी मोदींना दिले.

# लोकसभा निवडणुकीत निर्णायक ठरणार महिला शक्ती !

**मुंबई (प्रतिनिधी) :** पाच टप्प्यात होणाऱ्या आगामी लोकसभा निवडणुकीतील उमेदवारांचे भवितव्य ठरविण्यात यंदा महिला मतदारांचा महत्वाचा वाटा असेल. कारण २००४, २००९, २०१४, आणि २०१९ च्या तुलनेपेक्षा २०२४ मध्ये महिला मतदारांची संख्या वाढली आहे. २००४ मध्ये पुरुष आणि महिला मतदार अशी स्वतंत्र नोंदणी करण्यात आलेली नव्हती. त्यामुळे त्यावर्षी एकूण ३ कोटी ४२ लाख ६३ हजार ३१७ मतदारांची नोंदणी झाली. २००९ आणि २०१४ या दोन्ही लोकसभा निवडणुकीसाठी करण्यात आलेल्या मतदार नोंदणीमध्ये महिला मतदारांची संख्या पुरुष मतदारांपेक्षा कमी होती. मात्र २०१९ च्या लोकसभा निवडणुकीसाठी करण्यात आलेल्या मतदार नोंदणीत महिला मतदारांची संख्या वाढली आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार १ हजार पुरुषांमागे ९२५ महिला असे प्रमाण होते. सन २०१४ मध्ये मतदार यादीतील महिलांचे प्रमाण १ हजार पुरुषांमागे ८८९ महिला इतके होते. सन २०१९ मध्ये १ हजार पुरुषांमागे ९११ महिला असे प्रमाण होते. २०२४ मध्ये १ हजार पुरुषांमागे ९२३ महिला अशी लक्षणीय सुधारणा झाली आहे.

**स्वीप अभियान**

महिला मतदार जागृतीसाठी भारत निवडणूक आयोग, स्वीप कार्यक्रमाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवित आहे. महिला मतदारांची संख्या वाढविणे हा या अभियानाचे महत्वाचे उद्दीष्ट आहे. त्यासाठी अंगणवाडीसेविका, आशा कर्मचारी, परिचारिका, महिला बचत गट, अशासकीय संस्था आदींचे सहकार्य महिला मतदारांची नोंदणी वाढविण्यासाठी घेण्यात येत आहे. शिवाय उद्योग, शिक्षण, सामाजिक, साहित्य, कला-संस्कृती यासह विविध क्षेत्रातील अग्रणी महिलांच्या माध्यमातून महिलांना मतदार नोंदणीसाठी प्रोत्साहित करण्यात येत आहे.

**एकूण मतदार**

२०१९ मध्ये सेवा मतदार धरुन ८ कोटी ८६ लाख ७६ हजार ९४६ एकूण मतदार असल्याची नोंद करण्यात आली आहे. यामध्ये ४ कोटी ६४ लाख २५ हजार ३४८ पुरुष मतदार आहेत. तर ४ कोटी २२ लाख ७९ हजार १९२ महिला मतदार आणि २ हजार ४०६ तृतीयपंथी मतदार होते. २०२४ मध्ये ५ एप्रिल २०२४ नुसार एकूण ९ कोटी २६ लाख ३७ हजार २३० एकूण मतदार असल्याची नोंद करण्यात आली आहे. यामध्ये ४ कोटी ८६ लाख ०४ हजार ७९८ पुरुष मतदार आहेत. तर ४ कोटी ४४ लाख १६ हजार ८१४ महिला मतदार आणि ५ हजार ६१८ तृतीयपंथी मतदार आहेत.

# लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबई शहर जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेसंदर्भात आढावा बैठक

**मुंबई (प्रतिनिधी) :** लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने मुंबई शहर जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था तसेच आदर्श आचारसंहितेच्या अंमल बजावणीबाबत मुंबई शहर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी संजय यादव यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली. मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या बैठकीत मा. भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आदर्श आचारसंहिता व कायदा सुव्यवस्थेबाबत आवश्यक त्या उपाययोजना व दक्षता घेण्याचे निर्देश जिल्हाधिकारी श्री. यादव यांनी संबंधित विभागांना दिले. निवडणूक प्रक्रियेच्या कामकाजाच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्थेचा दैनंदिन अहवाल अद्ययावत ठेवून तो दररोज पाठविण्याबाबत पोलीस उपायुक्त यांनी दक्षता घेण्याच्या सूचनाही श्री. यादव यांनी संबंधित अधिकाऱ्यांना केल्या. मुंबई शहर जिल्ह्याच्या बहुतांश सीमा या सागराशी संलग्न असल्यामुळे सागरी सीमा सुरक्षेशी संबंधित कोस्ट गार्ड मेरीटाइम बोर्ड आणि मुंबई पोलीस यांच्यामध्ये योग्य समन्वय ठेवण्याचे निर्देश श्री. यादव यांनी संबंधितांना दिले. अवैध मद्य वाहतुकीवर नियंत्रण व त्याबाबत आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी श्री. यादव यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. मुंबई शहर जिल्ह्याला लागून असलेल्या मुंबई उपनगर जिल्ह्याचे फ्लाईंग सर्व्हेलन्स टीम (खझ), स्टॅटस्टीक सर्व्हेलन्स टीम यांच्याशी परस्परांमध्ये समन्वय ठेवण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्री. यादव यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. या बैठकीला अपर जिल्हाधिकारी तथा समन्वय अधिकारी (कायदा व सुव्यवस्था) तेजुसिंग पवार ,मुंबई शहर उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्री श्यामसुंदर सुरवसे, मेरीटाईम बोर्ड उपजिल्हाधिकारी श्रीमती अंजली भोसले आदी उपस्थित होते.

# आघाडीत मतभेद असल्यानेच मैत्रीपूर्ण लढतीचे सूत्र : आंबेडकर

**मुंबई (प्रतिनिधी)** महाविकास आघाडीत आपापसात एकमत नाही हे मी पहिल्यापासून सांगत होतो. ते आता दिसून आले आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेच्या वेगवेगळया उमेदवारी यादी जाहीर होत आहेत. त्यांचे मतभेद कायम असल्यानेच आता त्यांनी मैत्रीपूर्ण लढतीचा फॉर्म्युला पुढे आणला असल्याचे वंचितचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी रविवारी नागपूर येथे बोलताना स्पष्ट केले आहे. आघाडीत एकमत नसल्याने आम्ही जर त्यांच्यात गेलो असतो तर आणखीनच बिघाडी झाली असती म्हणूनच आम्ही वेगळी भूमिका घेतली. काँग्रेसला सात जागांवर पाठिंबा देण्याचे मान्य केले असून त्यापैकी दोन जागांवर पाठिंबा जाहीर केल्याचेही ते म्हणाले. आघाडीत मैत्रीपूर्ण लढत होणार होती हे आम्हाला अगोदरपासून माहीत होते. त्यामुळे महाविकास आघाडीचे भांडण आधी मिटवा ते मिटले की, आम्हाला मतदारसंघ मागायला सोपे होईल. परंतु, वंचित आम्हाला जागा देत नाही, कोणत्या पाहिजे ते सांगत नाही असे त्यांच्याकडून सांगण्यात येत होते. त्यांचा समझोता होत नाही त्याठिकाणी आम्ही जाऊन त्यामध्ये बिघाड होण्याची परिस्थिती टाळण्याच्या दृष्टिकोनातून आम्ही काही महत्वाच्या भूमिका घेतल्याचे आंबेडकरांनी स्पष्ट केले. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना आम्ही पत्र लिहिले की, मविआमध्ये तुम्हाला ज्या जागा दिल्या आहेत त्यापैकी सात जागांवर आम्ही तुम्हाला पाठिंबा देतो. त्यानुसार कोल्हापूर आणि नागपूर अशा दोन जागांवर आम्ही त्यांना पाठिंबा जाहीर केला आहे. उरलेल्या जागांची त्यांच्याकडून यादी येईल. त्यानुसार आम्ही त्यांना पाठिंबा देवू, असे आंबेडकर म्हणाले. वंचितला सोबत घेण्याच्या महाविकास आघाडीला दोन अडचणी होत्या. एक भारतीय जनता पक्ष, आरएसएस आणि मोदी यांना अंगावर घेण्याची ताकद आमच्यात आहे. दुसरी विस्थापितांच्या सत्तेला प्रस्थापितांचा कायम विरोध राहिला आहे. तसेच, आमचा असा आरोप आहे की, गेल्या निवडणुकीत आमच्या आठ जागा या काँग्रेस आणि राष्ट्रवादीमुळे पडल्या. त्या आठ जागांमध्ये हिंदू मते मिळाली पण मुस्लीम मते काँग्रेस आणि राष्ट्रवादीने घेतली, असल्याचे प्रकाश आंबेडकर यांनी या वेळी स्पष्ट केले.

## वंचितला निरनिराळे निवडणूक चिन्ह

**मुंबई (प्रतिनिधी)** येत्या १९ एप्रिल रोजी होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदानासाठी वंचित बहुजन आघाडीला निरनिराळे निवडणूक चिन्ह देण्यात आले आहे. लोकसभेच्या पाचपैकी चार मतदारसंघात वंचितला तीन वेगवेगळे निवडणूक चिन्ह मिळाले आहे. निवडणूक आयोगाने सोमवारी पहिल्या टप्प्यातील निवडणुकीसाठी उमेदवार आणि त्यांना वितरित झालेल्या निवडणूक चिन्हांनी माहिती दिली. त्यानुसार वंचित बहुजन आघाडीला रामटेक आणि गडचिरोली -चिमूर लोकसभा मतदारसंघात गॅस सिलिंडर, भंडारा लोकसभा मतदारसंघात उसाची मोळी घेतलेला शेतकरी तर चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात रोड रोलर हे निवडणूक चिन्ह मिळाले आहे. वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी मध्यंतरी नवी दिल्लीत जाऊन निवडणूक आयुक्तांची भेट घेतली होती. त्यावेळी त्यांनी लोकसभा निवडणुकीसाठी गॅस सिलिंडर, शिट्टी किंवा रोड रोलर यापैकी एक निवडणूक चिन्ह मिळावे, अशी मागणी केली होती. मात्र, निवडणूक आयोगाने वंचितला एकच निवडणूक चिन्ह देण्याचे टाळले आहे.

## सचिन साठेंचा ठाकरे गटात प्रवेश

**मुंबई (प्रतिनिधी)** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे नातू आणि क्रांती सेनेचे अध्यक्ष सचिन साठे यांनी शुक्रवारी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी साठे यांना शिवबंधन बांधून त्यांचे पक्षात स्वागत केले. साठे यांच्या पक्षप्रवेशामुळे सांगली लोकसभा मतदारसंघात ठाकरेंच्या उमेदवाराला बळ मिळणार असल्याची चर्चा आहे. भाजपचे जळगावचे खासदार उन्मेष पाटील, पारोळाचे माजी नगराध्यक्ष करण पवार यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह नुकताच ठाकरे गटात प्रवेश करून भाजपला मोठा धक्का दिला असतानाच आज सचिन साठे यांनी मातोश्री निवासस्थानी उद्धव ठाकरे यांची भेट घेऊन पक्षात प्रवेश केला. राज्यात लोकसभा निवडणुकीचे वातावरण तापले आहे. या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीकडून निवडणूक लढविणाऱ्या राज्यभरातील उमेदवारांना क्रांती सेनेचे कार्यकर्ते पाठिंबा देणार असल्याचे साठे यांनी वेळी जाहीर केले.

## प्रत्येक बुथवर ३७० मते वाढविण्याचा भाजपचा निर्धार

### सहमुख्य प्रवक्ते विश्वास पाठक यांची माहिती

**मुंबई (प्रतिनिधी)** लोकसभा निवडणुकीत अब की बार ४०० पार ही घोषणा प्रत्यक्षात आणण्यासाठी भाजपने प्रत्येक मतदान बुथवर ३७० मते वाढविण्याचा निर्धार केला आहे, अशी माहिती भाजपचे प्रदेश सह मुख्य प्रवक्ते विश्वास पाठक यांनी मंगळवारी दिली. यासाठीचे बूथ विजय अभियान येत्या ३ एप्रिलपासून सुरु होणार असून हे अभियान सहा दिवस चालणार असल्याचे त्यांनी सांगितले. विधानसभा पातळीवर पक्षाच्या बूथ स्तरीय कार्यकर्त्यांचे तसेच ५० प्रमुखांचे मेळावे या अभियानात आयोजित केले जाणार आहेत. मागील तीन निवडणुकीतील मतदानाच्या आकडेवारीचा आढावा घेऊन यावेळच्या निवडणुकीसाठी मतदानाचे उद्दिष्ट निश्चित केले जाणार आहे. या अभियानात प्रत्येक बूथवर मागच्या निवडणुकीपेक्षा ३७० मते वाढवण्यासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात येणार आहेत. या अभियानात समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचण्याचे लक्ष्य आहे, असेही पाठक यांनी नमूद केले. घरोघरी पत्रके पोहोचवून मतदारांशी थेट संपर्क साधणे, प्रत्येक घर, वाहनांवर स्टिकर्स लावणे, लाभार्थींशी नियमित संपर्कात राहणे, प्रत्येक कार्यकर्त्याच्या घरी भाजपचा झेंडा लावणे आदी उपक्रम राबवले जातील. युवा वर्ग, महिला अशा समाजातील विविध घटकांसाठी पाच समूह बैठकाही घेण्यात येतील. भाजपशी संबंधीत नसलेल्या मतदारांपर्यंत मोदी सरकारचे कार्य आणि योजना पोहोचवून भाजपला मत देण्यासाठी त्यांचे मन वळवण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत, असेही पाठक यांनी सांगितले.

# सरकारी अधिकाऱ्यांना हाताशी धरून घोटाळा, अनिल परब यांचा रामदास कदम यांच्यावर आरोप

**मुंबई (प्रतिनिधी)** शिंदे गटाचे नेते रामदास कदम यांनी सरकारी अधिकाऱ्यांना हाताशी धरून घोटाळे केले आहेत, असा गंभीर आरोप शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते अनिल परब यांनी मंगळवारी येथे केला. कदम यांनी केलेले १२ ते १३ घोटाळे आपण लवकरच बाहेर काढू, असेही परब यांनी जाहीर केले. परब यांच्या या आरोपामुळे शिवसेनेच्या ठाकरे गट आणि शिंदे गटात पुन्हा आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झाडण्याची चिन्हे आहेत. अनिल परब यांनी आज पत्रकार परिषदेत रामदास कदम यांच्यावर घोटाळ्याचा आरोप करताना खेडमधील एका भूखंडाला दाखला दिला. कदम यांनी त्यांच्या मंत्रिपदाचा गैरफायदा घेतला असून सरकारी अधिकाऱ्यांच्या सहभागाशिवाय हे घोटाळे होऊच शकत नाही. मी रामदास कदम यांचे १२ ते १३ घोटाळे बाहेर काढणार आहे. यातील दोन प्रकरणाची कागदपत्रे मी किरीट सोमया यांना देणार आहे. किरीट सोमया हे महाराष्ट्राचे अण्णा हजारे आहेत. त्यांनी रामदास कदम यांच्यासह त्यांच्या मुलांच्या घोटाळ्याची चौकशी करावी, अशी मागणी अनिल परब यांनी केली. भाजपने मध्यंतरी लोकसभा निवडणुकीसाठी सर्वेक्षण केले. त्यात शिंदे गटाच्या उमेदवारांबाबतचे सर्वेक्षण नाकारात्मक आले आहे. याबाबत परब यांना विचारले असता ते म्हणाले की, संजय शिससाट यांना आता कळेल की, शिवसेना आणि शिंदे गटात किती फरक आहे. आम्ही त्यांना शिवसैनिक म्हणून उमेदवारी दिली होती. त्यामुळे जे आज इतक्या मोठ्या पदावर जाऊन बसले आहेत. आमच्याकडे सर्व्हेक्षण करून उमेदवारी दिली जात नाही असा टोला त्यांनी शिंदे गटाला मारला. एकनाथ शिंदेसोबत गेलेल्या १३ खासदारांच्या जागेसाठी त्यांना संघर्ष करावा लागत आहे. ठाण्याची जागा आनंद दिघे यांनी भाजपकडून शिवसेनेकडे खेचून घेतली. आता जागावाटपात ठाण्याची जागा मिळवण्यासाठी त्यांना संघर्ष करावा लागत आहे. एकनाथ शिंदे यांच्यावर विश्वास ठेवून १३ खासदार आणि काही आमदार सोबत गेले आहेत. त्यांना निवडून आणले नाही तर राजीनामा देऊन गावाकडे जाऊन शेती करेन, असे म्हणणाऱ्या मुख्यमंत्र्यांनी त्यांच्याकडे असलेल्या १३ जागा वाचवून तरी दाखवाव्यात आणि त्यानंतर निवडून आणण्याची भाषा करावी, असे आव्हान अनिल परब यांनी दिले. शिंदे यांच्यासोबत गेलेले कृपाल तुमाने यांचे तिकीट कापण्यात आले आहे. इतर लोकसभा मतदारसंघातही अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. हेमंत गोडसे, भावना गवळी यांना तिकीट जाहीर झालेले नाही. हेमंत पाटील यांची उमेदवारी बदलण्याची चर्चा सुरु आहे. खासदारांच्या १३ जागांसाठी शिंदे गटाची ही परिस्थिती आहे. मग विधानसभा निवडणुकीच्या वेळेस ५० जागांसाठी काय हाल होतील हे तेव्हाच कळेल, असा टोलाही परब यांनी लगावला.

## लोकसभेच्या जागांसाठी शिंदेंचा भाजपशी झुंज , उमेदवार निश्चितीत भाजपचा हस्तक्षेप

**मुंबई (प्रतिनिधी)** महायुतीत आपल्या गटातील १३ खासदारांच्या मतदारसंघांसह लोकसभेच्या अतिरिक्त जागा पदरात पाडून घेण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भाजपशी झुंज द्यावी लागत आहे. शिंदे यांच्यासाठी प्रतिष्ठेच्या असलेल्या ठाणे, कल्याणच्या जागांबाबतची अनिश्चितता अद्याप कायम आहे. अशातच शिंदे गटाचे उमेदवार निश्चित करताना भाजपकडून हस्तक्षेप होत असल्याने शिंदे यांच्यावर जाहीर केलेले उमेदवार बदलण्यासाठी दबाव आहे. भाजपच्या या दबाबामुळे शिंदे गटात कमालीची अस्वस्थता आहे. लोकसभा निवडणूक जाहीर होईपर्यंत शिंदे गटाचे नेते लोकसभेच्या २२ जागांवर ठाम होते. २२ पेक्षा एकही जागा कमी घेणार नाही, असा शिंदे गटाचा सूर होता. मात्र, भाजपच्या दिल्लीतील नेत्यांनी डोळे वटारल्यानंतर शिंदे गटाने जागावाटपात नरमाईची भूमिका घेतली आहे. आता २२ नव्हे तर उद्धव ठाकरेंचे नेतृत्व झुगारून सोबत आलेल्या सर्व १३ खासदारांना पुन्हा उमेदवारी मिळवून देण्यात शिंदे यांना अपयश आले आहे. रामटेक लोकसभा मतदारसंघातून मावळते खासदार कृपाल तुमाने यांना डावलण्यात आले आहे. रामटेकमध्ये भाजपच्या सांगण्यावरून शिंदे गटाला काँग्रेसमधून राजू पारवे यांना आयात करावे लागले. आता ठाणे, कल्याण, नाशिक, पालघर, रत्नागिरी-सिंधुदुर्ग आदी महत्वाचे लोकसभा मतदारसंघ मिळविण्यासाठी एकनाथ शिंदे यांना भाजपशी लढावे लागत आहे. ठाणे अथवा कल्याण यापैकी एक जागा आम्हाला मिळावा, अशी भाजपची मागणी आहे. हे दोन्ही मतदारसंघ मिळणार नसतील तर ठाणे मतदारसंघात भाजप सांगेल तो उमेदवार असावा, अशी अट भाजपने ठेवली आहे. त्यामुळे शिंदे गटाची कोंडी झाली असून कार्यकर्तेही संभ्रमात आहेत. पालघरच्या जागेवर भाजपने हक्क सांगितला आहे. येथील विद्यमान खासदार राजेंद्र गावित हे सध्या शिंदे गटात असले तरी त्यांची ओढ भाजपकडे आहे. त्यामुळे भाजपला पालघरची जागा हवी आहे. नाशिक लोकसभा मतदारसंघात हेमंत गोडसे हेच उमेदवार असतील, अशी घोषणा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी केली होती. मात्र, आता शिंदे गटाला उमेदवार नव्हे तर जागा राखण्यासाठी धडपडावे लागत आहे. नाशिकमधून उमेदवारी जाहीर व्हावी म्हणून हेमंत गोडसे यांनी ठाण्यात एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी शक्तिप्रदर्शन केले. याशिवाय पालकमंत्री दादाजी भुसे, गोडसे आणि नाशिक जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी मुंबईत ठाण मांडूनही नाशिकची जागा शिंदे गटाकडून हिसकावून घेतली जात असल्याचे स्पष्ट झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ यांनी आपण नाशिकमधून लढावे, असा निर्णय पक्षाने घेतल्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे गोडसे यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता पूर्णपणे मावळली आहे. शिंदे गटाने आपल्या पहिल्या यादीत हिंगोलीतून हेमंत पाटील यांना उमेदवारी दिली आहे. भाजपचा हेमंत पाटील यांच्या उमेदवारीला विरोध आहे. त्यामुळे येथील उमेदवार बदलासाठी एकनाथ शिंदे यांच्यावर दबाव आहे. यवतमाळ-वाशिम मतदारसंघात विद्यमान खासदार भावना गवळी यांना पुन्हा उमेदवारी देण्यास भाजप अनुकूल नाही. त्यामुळे गवळी यांची उमेदवारी अधांतरी आहे. रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघ भाजप लढणार हे आता जवळपास स्पष्ट झाले आहे. तर शिंदे गटाला उस्मानाबादची (धाराशिव) जागा राष्ट्रवादीला सोडावी लागली आहे.

# धाराशिवमध्ये दिर आणि भावजय यांच्यात लढत

## राष्ट्रवादीची अर्चना पाटील यांना उमेदवारी

**मुंबई (प्रतिनिधी)** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसने धाराशिव (उस्मानाबाद) लोकसभा मतदारसंघातून माजी मंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांच्या स्नुषा आणि भाजपचे विद्यमान आमदार राणा जगजितसिंह पाटील यांची पत्नी अर्चना पाटील यांना उमेदवारी दिली आहे. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी गुरुवारी अर्चना पाटील यांच्या उमेदवारीची घोषणा केली. त्यामुळे धाराशिवमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ओमराजे निंबाळकर आणि राष्ट्रवादीच्या अर्चना पाटील यांच्यात लढत होईल. हे दोन्ही उमेदवार नात्याने दीर-भावजय आहेत. महायुतीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला लोकसभेच्या पाच जागा आल्या आहेत. यापैकी रायगड, शिरूर आणि बारामती लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादीने उमेदवार घोषित केले आहेत. सुनील तटकरे यांनी आज प्रदेश कार्यालयात पत्रकार परिषद घेऊन अर्चना पाटील यांच्या उमेदवारीची घोषणा केली. पाटील यांच्या उमेदवारीची घोषणा होण्यापूर्वी त्यांनी तटकरे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. या प्रवेशानंतर त्यांना लगेच लोकसभेची उमेदवारी देण्यात आली. राज्यात महायुती लोकसभेच्या ४५ पेक्षा जास्त जागा जिंकणार असून धाराशिवची जागा मोठ्या मताधिक्क्याने निवडून येईल, असा विश्वास तटकरे यांनी यावेळी व्यक्त केला. अर्चना पाटील यांच्या उमेदवारीची घोषणा होत असताना धाराशिव लोकसभा मतदारसंघातील आमदार राणा जगजितसिंह पाटील, अभिमन्यू पवार, ज्ञानराज चौगुले, राजेंद्र राऊत आदी उपस्थित होते. दरम्यान, नाशिक लोकसभेच्या उमेदावरीची घोषणा येत्या एक-दोन दिवसात होईल, अशी माहिती तटकरे यांनी दिली. महायुतीत आणखी काही जागांवर चर्चा सुरु आहे. त्यामुळे येत्या काही दिवसात महायुतीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपला किती जागा मिळाल्या आणि त्यांचे उमेदवार यांची एकत्रित माहिती दिली जाईल, असे तटकरे यांनी सांगितले. सर्वोच्च न्यायालयाने घड्याळ या निवडणूक चिन्हाच्या वापराबाबत ज्या सूचना केल्या आहेत त्याची माहिती आम्ही लोकसभा निवडणुकीत उमेदवार, पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष आदींना देण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार यांच्या ऐवजी यशवंतराव चव्हाण छायाचित्र वापरणार असल्याचे सुनील तटकरे यांनी अन्य एका प्रश्नाच्या उत्तरात स्पष्ट केले.

## प्रकाश आंबेडकरांचा उमेदवारी अर्ज दाखल

**मुंबई (प्रतिनिधी)** लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यातील आठ लोकसभा मतदारसंघात उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत गुरुवारी संपली. त्यामुळे आठही मतदारसंघात अर्ज भरण्यासाठी प्रमुख राजकीय पक्षांच्या उमेदवारांकडून शक्तिप्रदर्शन केले. वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी सकाळी आपला उमेदवारी अर्ज भरला. बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ वाशीम, हिंगोली, नांदेड आणि परभणी लोकसभा मतदारसंघासाठी येत्या २६ एप्रिलला मतदान होत आहे. या आठही मतदारसंघात उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत ४ एप्रिलला दुपारी तीन वाजता संपला आहे. त्यामुळे अर्ज भरण्यासाठी उमेदवारांची लगबग असणार आहे. दरम्यान, बुलढाणा लोकसभा मतदारसंघातून शिवसेना शिंदे गटाच्या प्रतापराव जाधव, शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी अर्ज दाखल केला आहे. याशिवाय शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड, माजी आमदार विजयराज शिंदे यांनीही बुलढाण्यातून अर्ज भरला आहे. अकोल्यात भाजपच्या अनुप धोत्रे, वर्धा मधून भाजपच्या रामदास तडस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या अमर काळे, यवतमाळ-वाशिममधून शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या संजय देशमुख, हिंगोलीतून ठाकरे गटाचे नागेश पाटील अष्टीकर तर परभणीमधून महादेव जानकर यांनी आपापले अर्ज दाखल केले आहेत.

# कल्याणमधून वैशाली दरेकर यांना उमेदवारी, उद्धव ठाकरेंकडून चार उमेदवारांची घोषणा

**मुंबई (प्रतिनिधी)** शिवसेना शिंदे गटाकडून कल्याण लोकसभा मतदासंघासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे चिरंजीव डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या उमेदवारीची प्रतीक्षा असताना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने येथून वैशाली दरेकर यांना उमेदवारी जाहीर केली आहे. तर जळगाव लोकसभा मतदारसंघातून पारोळ्याचे माजी नगराध्यक्ष करण पवार यांना संधी देण्यात आली आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत चार लोकसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या नावाची घोषणा केली. महायुतीत ठाणे आणि कल्याण लोकसभा मतदारसंघावरून तिढा कायम आहे. भाजपने या दोनपैकी एका जागेवर दावा सांगितल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कल्याण लोकसभा मतदारसंघातील उमेदवार अद्याप जाहीर केलेला नाही. शिंदे गट आणि भाजपमधील जागावाटपाचा तिढा सुटला तर कल्याणमधून डॉ. शिंदे यांनाच उमेदवारी दिली जाण्याची दाट शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे गटाने कल्याणमध्ये महिला उमेदवार दिला आहे. वैशाली दरेकर यांनी २००९ ची लोकसभा निवडणूक महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या चिन्हावर लढवली होती. त्यावेळी त्यांनी एक लाखांहून अधिक मते घेतली होती. परंतु, मनसेत कोंडी होऊ लागल्याने त्या पक्षातून बाहेर पडून शिवसेनेत दाखल झाल्या. शिवसेना फुटीनंतर त्यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाबरोबरच राहणे पसंत केले. उत्तम वक्ता आणि आक्रमक चेहरा म्हणून कल्याणमध्ये त्यांची ओळख आहे. त्यामुळे कल्याणमधील लढत चुरशीची होण्याची शक्यता आहे. भाजपचे खासदार उन्मेष महाजन यांच्यासोबत शिवसेनेत प्रवेश करणारे पारोळ्याचे माजी नगराध्यक्ष करण पवार यांना जळगावमधून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. पवार यांचा सामना आता भाजपच्या स्मिता वाघ यांच्याशी आहे. उन्मेष पाटील यांच्या ठाकरे गटातील प्रवेशामुळे जळगावमधून त्यांना संधी दिली जाईल, चर्चा होती. मात्र, उद्धव ठाकरे यांनी करण पवार यांच्यावर विश्वास व्यक्त केला. दरम्यान, ठाकरे यांनी पालघरमधून भरती कामडी तर हातकणंगलेमध्ये स्वाभिमानी शेतकरी पक्षाचे उमेदवार राजू शेट्टी यांना पाठिंबा न देता माजी आमदार सत्यजित पाटील यांना लोकसभेच्या रिंगणात उतरविले आहे. भारती कामडी या पालघर जिल्हा परिषदेवर दोन वेळा निवडून आल्या असून त्यांनी जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष पदाची धुरा सांभाळली आहे. कामडी यांच्याकडे ठाकरे गटाचे महिला लोकसभा संघटकपद असून त्यांचा दांडगा लोकसंपर्क आहे. शिवसेनेत फूट पडल्यानंतर त्यांनी उद्धव ठाकरे यांची साथ सोडली नव्हती. कामडी यांना त्यांच्या निष्ठेचे फळ आता मिळाले आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले मतदारसंघात राजू शेट्टी यांनी उद्धव ठाकरे यांच्या पक्षाकडे पाठिंबा मागितला होता. त्यासाठी शेट्टी यांनी दोनवेळा मातोश्रीवर येऊन उद्धव ठाकरेंची भेट घेतली होती. मात्र, पाठिंबा मागण्याऐवजी मशाल चिन्हावर निवडणूक लढवावी, असा प्रस्ताव त्यांना ठाकरेंकडून देण्यात आला होता. मात्र, शेट्टी यांनी मशाल चिन्हावर निवडणूक लढण्यास नकार दिल्याने शिवसेनेने हातकणंगले येथून स्वतंत्र उमेदवार देण्याचा निर्णय घेतला आहे. शिवसेनेने आतापर्यंत एकूण २१ उमेदवार घोषित केले आहेत. उत्तर मध्य मुंबई आणि उत्तर मुंबई वगळता मुंबईतील इतर चार मतदारसंघात ठाकरे यांनी उमेदवार जाहीर केले आहेत. उत्तर मध्य मुंबई मतदारसंघ हा काँग्रेसकडे आहे. तर उत्तर मुंबई मतदारसंघावरून काँग्रेस आणि शिवसेनेत वाद सुरू आहे. याविषयी उद्धव ठाकरे यांना विचारले असता, यासंदर्भात मित्र पक्षांशी चर्चा सुरू असून ते ती जागा लढवणार असतील तर ठीक आहे. नाहीतर आम्ही आमचा उमेदवार आम्ही जाहीर करू, असे त्यांनी स्पष्ट केले.

# वापरा आणि फेका हीच भाजपची वृत्ती ! - उद्धव ठाकरे यांचा घणाघात

## भाजपचे खासदार उन्मेष पाटील यांचा ठाकरे गटात प्रवेश

**मुंबई (प्रतिनिधी)** वापरा आणि फेकून द्या... काम झाले की फेकून द्यायचे ही भाजपची वृत्ती आहे. या वृत्तीचा आम्हालाही फटका बसला आहे. त्यामुळे त्याविरोधात आम्ही लढायला उभे राहिलो असून जनमताचा प्रवाह फिरला की मोठ मोठे ओंडकेही वाहून जातात. भाजपची अवस्थाही अशीच होणार आहे, असा घणाघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी बुधवारी केला. सांगलीत मैत्रीपूर्ण लढत होणार नाही. कारण मैत्रीपूर्ण लढतीला काहीही अर्थ नसतो. जेव्हा मैत्री असते तेव्हा तेथे लढत नसते, असे सांगत त्यांनी सांगलीत मैत्रीपूर्ण लढतीची शक्यता फेटाळून लावली. सांगलीत मैत्रीपूर्ण लढत झाली तर महाराष्ट्राचे नव्हे तर देशाचा घात होईल, असा इशाराही ठाकरे यांनी काँग्रेसला दिला. जळगावमधील भाजपचे खासदार उन्मेष पाटील आणि पारोळ्याचे माजी नगराध्यक्ष करण पवार यांनी आज आपल्या असंख्य समर्थकांसह पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत मातोश्री येथे शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे यांनी भाजपच्या वापरा आणि फेकून द्या वृत्तीचा समाचार घेतला. भाजप वाढवण्यासाठी पाटील यांनी अतोनात मेहनत केली, तशीच महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यातील शिवसैनिकांनीही मेहनत केली. परंतु, वापरा आणि फेकून द्या, ही भाजपची वृत्ती आहे. त्यांच्या पक्षातील कट्टर, निष्ठावंत, पक्ष रुजविण्यासाठी ज्यांनी मेहनत घेतली त्यांनाही फेकून देण्याचे धोरण भाजपने अवलंबिले आहे. त्याविरूद्ध त्यांच्या एका निष्ठावंत कार्यकर्त्यांने असंख्य सोबत्यांसह शिवसेनेत प्रवेश केला. पण यालाच खरे बंड म्हणतात. आमच्या पक्षाशी झाली होती ती गद्दारी होती. त्यामुळे खरे बंड कसे आणि काय असते ते उन्मेष पाटील आणि करण पवार यांनी दाखवून दिले आहे, असे उद्धव ठाकरे म्हणाले. काहींनी खोके घेण्यासाठी गद्दारी केली. सत्तेकडे लोकांचा ओढा असतो. मात्र, तुम्ही जनतेची सत्ता आणण्यासाठी इकडे आलात. आपले विचार एक आहेत. काहींनी आपली फसगत केली. फसवणूक करणाऱ्यांना आता निवडून द्यायचे नाही, असे ठाकरे यांनी ठणकावले. प्रकाश आंबेडकर आणि माझ्या आजोबांचा एक ऋणानुबंध होता. त्या ऋणानुबंधाला जागून आम्ही हुकूमशाहीविरोधात एकत्र आलो होतो. पण आज त्यांचे आणि आमचे जमले नसले तरी भविष्यात जमणारच नाही, अशी भूमिका त्यांनी घेऊ नये, असे आवाहन उद्धव ठाकरे यांनी आंबेडकर यांना केले. त्यांचे आणि माझे आजोबा त्यावेळी समाज सुधारणेसाठी झटले होते. आमची प्रामाणिक इच्छा होती की, आम्ही दोघेजण हुकूमशाही विरोधात आणि विशेषकरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेली घटना धोक्यात आली असताना आपण एकत्र येऊन सर्वसामान्य जनतेची ताकद या हुकूमशाहीला दाखवून द्यायला हवी होती, असेही ठाकरे म्हणाले. आंबेडकर यांनी संजय राऊत यांच्यावर आरोप केले होते. पण त्यात काही तथ्य नव्हते, असे सांगत आंबेडकर हे काहीही बोलले तरी आम्ही त्यांच्याविरोधात बोलणार नसल्याचे ठाकरे यांनी स्पष्ट केले.

**भाजपने माझी अवहेलना केली : उन्मेष पाटील**

राजकारण करताना आमदार, खासदार या पदासाठी कधीही काम केले नाही. ही पदे साधन असून लोकांसाठी त्याचा फायदा होईल, या हेतूनेच काम करत होतो. आता खासदारकीचे तिकीट मिळाले नाही म्हणून पक्ष सोडलेला नाही. तर आपण केलेल्या विकासाची किंमत भाजपला नाही, माझी सतत अवहेलना केली अशी खंत उन्मेष पाटील यांनी यावेळी व्यक्त केली. बदल करण्यासाठी काम करत असून बदला घेण्यासाठी काम करत नाही. मात्र, सध्या सुरू असलेल्या बदल्याच्या राजकारणाने आपण व्यथित झालो आहोत, असे पाटील म्हणाले. आता माझी लढाई पदासाठी नसून आत्मसन्मानासाठी आहे. त्यामुळे आपण सहकाऱ्यांसोबत शिवसेनेत प्रवेश केला आहे. आता शिवसेनेच्या मशालीची धग गावागावापर्यंत नेत विकासाचे राजकारण करणार असल्याची ग्वाही उन्मेष पाटील यांनी यावेळी दिली.

# फडणवीस, बावनकुळेंची पटोलेंवर टीका

**मुंबई (प्रतिनिधी)** काँग्रेस पक्ष एकिकडे दिल्लीत न्यायपत्र जाहीर करतो आणि दुसरीकडे त्यांचे राज्याचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले भर सभेत एका खासदाराच्या मृत्यूची कामना करतात, अशी टीका करत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी पटोले यांच्यावर निशाणा साधला. तर नाना, मते मिळविण्यासाठी गिधाडवृतीने वागू नका. राजकारणासाठी कुणाचे मरण चिंतू नका, असा सल्ला देत भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी नाना पटोले यांचा निषेध केला आहे. नाना पटोले यांनी गुरुवारी अकोल्यात एका सभेत बोलताना अकोल्याचे विद्यमान खासदार संजय धोत्रे यांच्याविषयी वादग्रस्त विधान केले होते. खासदार धोत्रे सध्या व्हेंटिलेटवर आहेत. त्यांचे व्हेंटिलेटर केव्हा काढतील मला माहिती नाही. पण ते निवडणुकीतच काढतील, असे नाना पटोले म्हणाले होते. त्यांच्या या वक्तव्यानंतर भाजपने पटोले यांच्यावर जोरदार टीका केली आहे. काँग्रेस पक्ष एकिकडे दिल्लीत न्यायपत्र जाहीर करतो आणि दुसरीकडे त्यांचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले भर सभेत एका खासदाराच्या मृत्यूची कामना करतात? असंवेदनशीलतेचा हा कहर आहे. निवडणुकीत आपण विरोधक असलो तरी विरोधकांच्या मृत्यूची कामना, ही महाराष्ट्राची संस्कृती नाही. महाराष्ट्र आणि अकोल्यातील जनतेची तत्काळ माफी मागा. खा. संजय धोत्रे जी यांना दीर्घायुष्य लाभावे, अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो असे फडणवीस यांनी म्हटले आहे. चंद्रशेखर बावनकुळे यांनीही नाना पटोले यांना प्रत्युत्तर दिले आहे. ते म्हणाले की, अकोल्याचे खासदार संजय धोत्रे यांना दीर्घायुष्य लाभो. त्यासाठी आम्ही सर्वजण रोज प्रार्थना करीत असतो. पण त्यांच्याबद्दल अभद्र बोलून त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या असंख्य नागरिकांच्या, अकोला मतरसंघातील मतदारांच्या मनाला वेदना पोहोचविल्या आहेत. तुम्हाला ही जनता माफ करणार नाही. कावळ्याच्या शापाने गाय मरत नसते. तुम्ही भाजपविरोधात हवा तेवढा खोटा प्रचार करा, लोकांची मते मिळविण्यासाठी कुणासमोरही पायघड्या घाला. पण तुमच्या घाणेरड्या राजकारणासाठी कुणाचे मरण चिंतू नका. कुणाच्या मरणाची वाट बघत त्यावर पोट भरणे ही गिधाडांची वृत्ती असते आणि केवळ मते मिळविण्यासाठी तुम्ही गिधाडांच्या वृत्तीने वागू नका, असे बावनकुळे यांनी म्हटले आहे.

## संपादकीय

संपादक : अनिल राजाराम पवार

# नवमतदारांची ही उदासीनता

स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारतात मतदानाची टक्केवारी कधीही समाधानकारक नव्हती आणि नाही. स्वातंत्र्य मिळाल्याचा क्षण किती ऐतिहासिक होता. भारताचा सलग, एकसंध नकाशा साकारला होता. तरीही, सन १९५२मध्ये केवळ ४५ टक्के पात्र मतदारांनी आपला मतदानाचा अधिकार बजावला. ही टक्केवारी वाढत वाढत सन २०१९मध्ये ६७.४० टक्क्यांवर आली. हा मतदानाचा आजवरचा विक्रम आहे. सन १९७७मध्ये मतदारांनी ऐतिहासिक कौल देऊन काँग्रेसला प्रथमच घरी पाठवले आणि जनता पक्षाचे राज्य आणले. तेव्हाही (फक्त) ६० टक्के मतदारांनीच मतदान केले होते. या निवडणुकीत किती मतदान होते, ते कळेलच; पण त्या आधी ज्या युवक-युवतींना मतदानाचा अधिकार मिळाला आहे; अशा किमान चार कोटी ९० लाख नवमतदारांपैकी केवळ ३८ टक्के नवमतदारांनीच मतदार नावनोंदणी केल्याचे उघड झाले. या नवमतदारांची ही उदासीनता धक्कादायक आहे. मतदानाचा निर्णय तर पुढचा, पण त्या आधी आपले नाव तरी निदान मतदारयादीत असावे; असेही या मुलामुलींना का वाटू नये ? सन २०१९मध्ये मतदानाची टक्केवारी वाढण्याचे प्रमुख कारण अनेक राज्यांमध्ये घराबाहेर पडलेल्या महिला मतदार, असे सांगितले गेले. हे खरे असेल तर महिलांचे हे सबळीकरण १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या सगळ्याच मुलींना का भावले नसावे ? इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर विक्रमी यश मिळवून राजीव गांधी पंतप्रधान झाले. तेव्हा त्यांनी सन १९८८मध्ये ६१वी घटनादुरुस्ती करून भारतातील मतदानाचे वय २१वरून १८वर आणले. हा फार महत्त्वाचा निर्णय होता. हे वय १८वर आणावे, अशी चर्चा संसदेत त्या आधी किमान दोन दशके चालू होती. मात्र, प्रत्यक्ष निर्णय राजीव गांधी यांनी घेतला. १८ ते २१ वर्षे या वयोगटातील काही कोटी तरुणांना नव्या सरकारच्या निवडीत समाविष्ट करून घेणे, हे संसदीय लोकशाहीचे पुढचे पाऊल होते. असा अधिकार हातात येणे; ही तरुणांच्या आयुष्यातील किती रोमहर्षक, आनंददायी घटना असायला हवी ! तसेच, हा केवळ अधिकार नाही; ते महत्त्वाचे कर्तव्यही आहे. मात्र, या साऱ्या प्रक्रियेशी आपण जोडले जावे, असे जर तरुणांना वाटत नसेल तर त्यात त्यांच्यापेक्षा उर्वरित साऱ्या समाजाचे आणि या समाजावर राज्य करणाऱ्या सगळ्या राजकीय पक्षांचे, नोकरशाहीचे काही तरी निश्चितच चुकते आहे. प्रचारासाठी कोट्यवधी रुपये खर्च करणाऱ्या, आपल्या राष्ट्रीय नेत्यांच्या पायांना विमानाची चाके बसविणाऱ्या राजकीय पक्षांना प्रचार मोहिमांच्या आधी मतदार नोंदणीची मोहीम आखावी आणि एकही नवमतदार यादीच्या बाहेर राहू नये, असे का बरे वाटत नसावे ? पंतप्रधान नरेंद्र मोदी अलीकडे अनेक सभांमध्ये कुणालाही मतदान करा; पण मतदानाचा हक्क बजाविल्याशिवाय राहू नका, असे आवाहन करीत असतात. ते सार्थ ठरायचे तर आधी नाव यादीत हवे. ते काम राजकीय पक्षांनी का करू नये ?

# औषधचिठ्ठी न देण्याच्या धोरणाचे काटेकोर पालन कराआयुक्त डॉ. कैलास शिंदे

**नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तपदाचा कार्यभार स्वीकारल्यापासून डॉ. कैलास शिंदे यांनी महापालिकेतील विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेण्यास सुरुवात केली आहे. आरोग्य सुविधेचा आढावा घेण्यासाठी त्यांनी बुधवारी पालिकेच्या वाशी रुग्णालयाला भेट देत प्रिस्क्रीप्शन फ्री सेवा अर्थात औषधचिठ्ठी न देता रुग्णालयाकडून औषध पुरवठा करण्याच्या धोरणाचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत. महानगरपालिकेच्या वाशी, नेरुळ व ऐरोली या तीन रुग्णालयांपैकी वाशी रुग्णालयामध्ये सर्वाधिक संख्येने रुग्ण उपचारांसाठी येत असतात. त्या ठिकाणची दैनंदिन बाहयरुग्ण संख्याही अधिक आहे. त्यादृष्टीने तेथे नागरिकांसाठी पुरेशी बैठक व्यवस्था, पिण्याचे स्वच्छ पाणी उपलब्ध असावे तसेच दर्शनी भागात आरोग्यविषयक माहिती देणारे पोस्टर्स, डिजीटल फलक अशी आरोग्य सूचनांची प्रचारसाधने वाढवावीत असे निर्देश त्यांनी दिले. तळमजल्यासह तिन्ही मजल्यांवरील वैद्याकीय सेवांची पाहणी करताना तेथील हवा खेळती राहण्याच्या दृष्टीने तत्परतेने उपाययोजना कराव्यात. अंतर्गत स्थापत्य व रंगरंगोटीची कामेही जलद करून घ्यावीत, असे निर्देश आयुक्तांनी दिले. रुग्णालयात येणाऱ्या व्यक्तीला प्रसन्न वातावरण लाभावे यादृष्टीने कार्यवाही करण्याचे त्यांनी सूचित केले. त्याचप्रमाणे अंतर्गत स्वच्छतेवर अधिक लक्ष देण्याच्या सूचनाही दिल्या. रुग्णांना देण्यात येणाऱ्या भोजनाचा दर्जाही उत्तम राहील याकडे विशेष लक्ष देण्याचे आयुक्तांनी सूचित केले. रुग्णालयात येणाऱ्या नागरिकांना औषधचिठ्ठी न देता रुग्णालयामार्फतच औषध पुरवठा करण्यात येतो. या प्रिस्क्रीप्शन फ्री सेवेची काटेकोर अंमलबजावणी केली जाईल व याबाबतची कोणतीही तक्रार प्राप्त होणार नाही याची विशेष दक्षता घेण्याचे आयुक्तांनी निर्देश दिलेत. रुग्णालयातील बाहयरुग्ण कक्ष, क्ष-किरण, सोनोग्राफी व सिटी स्कॅन कक्ष, पॅथोलॉजी, औषध वितरण कक्ष, अपघात विभाग, आपत्ती कक्ष, रक्तपेढी, आयसीयू, डायलिसीस, एनआयसीयू, प्रसूतीपूर्व कक्ष, शल्यचिकित्सा कक्ष, मेडिकल वॉर्ड, बालरोग विभाग, थॅलेसेमिया काळजी कक्ष, अस्थिव्यंग कक्ष, प्रसुती पश्चात कक्ष, औषध भांडार विभाग, मेडिकल रेकॉर्ड विभाग अशा विविध विभागांची प्रत्यक्ष पाहणी करीत आयुक्तांनी तेथील सुधारणांविषयी सूचना केल्या. रुग्णांच्या डिजिटल नोंदी उपचारासाठी येणाऱ्या रुग्णाचा केसपेपर काढण्यापासून ते आंतररुग्ण (आयपीडी) सेवा घेऊन तो बरा होऊन घरी परत जाईपर्यंतच्या कार्यालयीन नोंदी डिजिटल स्वरूपात घेतल्या जाव्यात यादृष्टीने हॉस्पिटल मॅनेजमेंट इंटिग्रेटेड सिस्टीम प्रणाली अद्यायावत करण्याचे व कागदरहित कामकाज करण्याचेही निर्देश आयुक्तांनी यावेळी दिले. त्यांनी सर्व्हर रूमचीही पाहणी केली. या भेटीदरम्यान त्यांच्यासमवेत वैद्याकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे, शहर अभियंता संजय देसाई तसेच विविध डॉक्टर व अधिकारी उपस्थित होते.

# अशोक चव्हाण शपथबद्ध

**मुंबई (प्रतिनिधी)** माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी शनिवारी नवी दिल्लीत राज्यसभा सदस्यत्वाची शपथ घेतली. राज्यसभेचे सभापती तथा उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी त्यांना शपथ दिली. शपथबद्ध झाल्याने अशोक चव्हाण प्रथमच राज्यसभेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहेत. यानिमित्ताने चव्हाण यांचे लोकसभा, राज्यसभा, विधानसभा आणि विधान परिषद हे संसदीय वर्तुळ पूर्ण झाले आहे. फेब्रुवारी महिन्यात झालेल्या निवडणुकीत राज्यसभेवर निवडून गेलेल्या सदस्यांचा आज शपथविधी पार पडला. आज पहिली शपथ भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांनी घेतली. त्यानंतर अशोक चव्हाण यांनी मराठीतून शपथ ग्रहण केली. यावेळी उपसभापती हरिवंश आणि राज्यसभा महासचिव पी. सी. मोदी, चव्हाण यांच्या पत्नी, माजी आमदार अमिता चव्हाण, दोन्ही कन्या सुजया चव्हाण आणि श्रीजया चव्हाण उपस्थित होत्या. शपथविधी सोहळ्यानंतर प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया देताना अशोक चव्हाण यांनी विधानपरिषद, विधानसभा, लोकसभा आणि राज्यसभा या चारही सभागृहांचे सदस्य म्हणून काम करण्याची संधी मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली विकसित भारताच्या उभारणीसाठी मी सर्वोपरी योगदान देण्याचा प्रयत्न करेन, असे त्यांनी सांगितले. राज्यसभेवर काम करण्याची संधी दिल्याबद्दल त्यांनी पक्षनेतृत्वासह संपूर्ण भारतीय जनता पक्षाचे आभार मानले.

# पटोलेंनी काँग्रेस आणि वंचितमध्ये फूट पाडली - प्रकाश आंबेडकर यांचा आरोप

**मुंबई (प्रतिनिधी)** काँग्रेस आणि वंचितमध्ये फूट खऱ्या अर्थाने नाना पटोले यांनी पाडली आहे. यासंदर्भात जेव्हा काँग्रेसच्या नेत्यांनी त्यांना पकडले तेव्हापासून महाविकास आघाडीच्या बैठकीत पटोलेंऐवजी बाळासाहेब थोरात यांना पाठवू लागले, असा आरोप वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी शुक्रवारी एक्स या समाज माध्यमातून केला. या आरोपामुळे काँग्रेस आणि वंचितमध्ये नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे. अकोला लोकसभा मतदारसंघातून वंचित बहुजन आघाडीच्या वतीने प्रकाश आंबेडकर हे निवडणूक लढवत आहेत. तर त्यांच्याविरोधात काँग्रेसने अभय पाटील यांना उमेदवारी दिली आहे. पाटील यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी काल अकोल्यात होते. त्यावेळी बोलताना पटोले यांनी अजूनही वेळ गेलेले नाही, अर्ज माघारी घेण्यापर्यंत वेळ आहे. तुम्हाला किती जागा पाहिजे ते सांगा, असे आवाहन आंबेडकर यांना उद्देशून केले होते. महाविकास आघाडीत तुम्ही परत या. तुम्हाला तीन जागा देतो, अशी ऑफर देत त्यासाठी मला वरिष्ठांना दिल्लीत विचारायची गरज नसल्याचेही पटोले म्हणाले होते. पटोलेंच्या या आवाहनाचा आंबेडकर यांनी समाचार घेतला. पटोलेंनी अकोल्यात येऊन जॉनी वॉकरसारखा जबरदस्त अभिनय केला. तुम्हाला संविधान वाचवायचे होते, तर आमचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. पुंडकरांना महाविकास आघाडीच्या बैठकीत दीड तास बाहेर का बसवले ? असा सवाल करत काँग्रेस आणि आमच्या नात्यात फूट टाकण्याचा प्रयत्न झाल्यानंतर काँग्रेसच्यावतीने बाळासाहेब थोरात महाविकास आघाडीच्या बैठकीला येऊ लागले होते, असा दावा करत या गोष्टी त्यांनी अकोल्यामध्ये सांगायला हव्या होत्या, असे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे.

# वंचितने आमच्यासोबतची चर्चा बंद केली ! - संजय राऊत यांचा खुलासा

**मुंबई (प्रतिनिधी)** वंचित बहुजन आघाडी आम्हाला तीन जागांचा प्रस्ताव दिला असे सांगत असले तरी आम्ही त्यांना आम्ही प्रत्यक्षात पाच जागांचा प्रस्ताव दिला होता. त्यात अकोला, रामटेक, धुळे आणि मुंबईतील एका मतदारसंघाचा समावेश होता. आणखी एक जागा त्यांच्यासाठी राखून ठेवली होती. त्यामुळे आम्ही वंचितसोबतची चर्चा बंद केलेली नाही. त्यांच्या नेत्यांनीच चर्चा बंद केली आहे, असा खुलासा शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मंगळवारी येथे केला. वंचित चर्चा करीत नाही म्हणून आम्ही निवडणुका लढायच्या नाहीत काय, असा सवालही त्यांनी आज पत्रकारांशी बोलताना केला. देशाच्या संविधानासाठी तसेच लोकशाहीच्या रक्षणासाठी जनता आणि देशहितासाठी आपण एकत्र यायला पाहिजे. जो वंचित, पीडित समाज आहे त्यांना त्यांचा हक्क मिळाला पाहिजे, हीच आमची भूमिका आहे. यामुळेच आम्ही त्यांच्याशी चर्चाही केली. आमच्या मनात काही खोट नाही. पारदर्शकपणे चर्चा केली आहे. आम्ही पाच जागांचा प्रस्ताव दिला होता. ते जरी आम्हाला तीनच जागांचा प्रस्ताव मिळाला असला असे सांगत असले तरी आम्ही त्यांना पाच जागांचा प्रस्ताव होता. पाच जागांच्या प्रस्तावात अकोला मतदारसंघाचा समावेश आहे. शिवसेनेची विद्यमान जागा असलेली रामटेकची जागाही त्यांना दिली होती. त्यामुळे आम्ही वंचितसोबतची चर्चा बंद केलेली नाही, त्यांच्या नेत्यांनी ती बंद केली आहे. आता त्यांनी सर्वत्र उमेदवार दिले आहेत. तरीही, अजूनही चर्चा होऊ शकते, असे सांगतानाच अकोल्याच्या पलिकडेही चर्चा होतात, असा टोलाही राऊत यांनी वंचितला लगावला. देशात होणाऱ्या लोकसभा निवडणुका ईव्हीएमशिवाय व्हाव्यात, देशात परिवर्तन हवे अशी देशातील सर्वसामान्यांची भावना आहे. त्यामुळे ईव्हीएम विरोधात देशभरात आंदोलन सुरू आहेत. वकील सुद्धा रस्त्यावर उतरले आहेत. निवडणूक आयोगाला मोठ्या प्रमाणात पत्र, निवेदन देण्यात आली. आता भाजपनेही ईव्हीएमशिवाय निवडणुका घेण्याची हिंमत दाखवावी, असे आव्हान संजय राऊत यांनी दिले. देशात लोकसभा निवडणुका ईव्हीएमवर होत आहेत. मात्र कुठलेही बटन दाबले तरी मत कमळालाच जात असल्याचा प्रकार अनेकदा उघडकीस आल्याने देशातील सर्वसामान्य नागरिकांच्या मनात भीती आहे. ईव्हीएमचा हा मोठा घोळ असून लोकांच्या मनात संभ्रम आहे. संपूर्ण जगात ईव्हीएम मशीनला विरोध होतो आहे, असे राऊत म्हणाले.

## रत्नागिरी-सिंधुदुर्गची जागा भाजपच लढविणार, भाजप नेते नारायण राणे यांचा निर्वाळा

**मुंबई (प्रतिनिधी)** रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभेची जागा भाजपच लढविणार असल्याचा स्पष्ट निर्वाळा भाजपचे कोकणातील नेते तथा केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी मंगळवारी येथे पत्रकार परिषदेत बोलताना केला. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचा रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघावरील दावा एकप्रकारे संपुष्टात आला आहे. महायुतीत रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघांवर भाजप आणि शिवसेना शिंदे गटाने दावा केला आहे. शिवसेना एकत्र असताना ही जागा शिवसेनेने जिंकल्यामुळे आम्हाला मिळावी, अशी मागणी शिंदे गटाने केली आहे. या संदर्भात उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आजच दावा केला. यावर नारायण राणे म्हणाले, दोन्ही जिल्ह्यातील जिल्हा परिषदा आणि अन्य ठिकाणी भाजपचे वर्चस्व आहे, त्यामुळे येथून भाजपच निवडणूक लढणार आहे. राणे यांच्या या दाव्यामुळे युतीत वादाची ठिणगी पडल्याचे चित्र आहे. नारायण राणे यांनी दिल्लीत झालेल्या इंडिया आघाडीच्या सभेवर टीका केली. ते म्हणाले, भ्रष्ट नेत्यांच्या अटकेविरोधात एकत्र येत दुखवटा साजरा करण्यासाठी रामलीला मैदानावर जमणाऱ्या सर्व भ्रष्ट नेत्यांना त्यांच्या पराभवाची गॅरंटी असल्यानेच त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर असभ्य भाषेत टीका केली. अशा लायकी नसलेल्यांना मतदारच निवडणुकीत तडीपार करतील अशा शब्दांत राणे यांनी उद्धव ठाकरे, राहुल गांधी, संजय राऊत यांच्यावर घणाघात केला. राजकीय उंची आणि बौद्धीक कुवत नसलेल्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर पातळी सोडून टीका करणे थांबवावे अन्यथा भाजप कार्यकर्त्यांना त्यांची लीला दाखवावी लागेल, असा इशाराही राणे यांनी यावेळी दिला.

## दीपक निकाळजेंनी घेतली उद्धव ठाकरेंची भेट

**मुंबई (प्रतिनिधी)** रिपब्लिकन पक्षाचे नेते दीपक निकाळजे यांनी शुक्रवारी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. या दोन नेत्यांमध्ये जवळपास एक तास चर्चा झाली. दक्षिण मध्य मुंबईतून ठाकरेंच्या उमेदवाराला पाठींबा देण्यासाठी निकाळजे यांनी ही भेट घेतल्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र, त्यांच्या चर्चेचा तपशील समजू शकलेला नाही. दीपक निकाळजे यांनी आज आपल्या कार्यकर्त्यांसह दुपारी मातोश्री निवासस्थानी उद्धव ठाकरेंची भेट घेऊन चर्चा केली. महाविकास आघाडीत उद्धव ठाकरे यांचा गट दक्षिण मध्य मुंबई लोकसभेची जागा लढवत आहे. येथून ठाकरे यांनी अनिल देसाई यांना उमेदवारी दिली आहे. लोकसभेच्या या मतदारसंघात चेंबूर विधानसभा मतदारसंघाचाही समावेश आहे. दीपक निकाळजे हे गेल्या २० वर्षापासून आंबेडकरी चळवळीत सक्रिय आहेत. आधी ते रिपाइं नेते रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली काम करत होते. त्यानंतर त्यांनी आठवले यांच्यापासून वेगळे होत स्वतःचा गट स्थापन केला. या गटाचे मुंबईसह ठाणे जिल्ह्याच्या काही भागात कार्यकर्त्यांचे जाळे आहे.

## तुंगारेश्वरचे संरक्षित वन धोक्यात, पर्यावरणदृष्ठ्या संवेदनशील क्षेत्रात प्रदूषणकारी कारखाने व अतिक्रमण



**वसई :** वसई पूर्वेच्या भागात तुंगारेश्वर अभयारण्यातील संरक्षित वनक्षेत्र व इको सेन्सेटिव्ह झोन मध्ये मागील काही वर्षापासून अतिक्रमण, बेकायदेशीरपणे उभे राहत असलेले प्रदूषणकारी कारखाने याचा मोठा परिणाम या वनक्षेत्रावर होऊ लागला आहे. या वाढत्या अतिक्रमणामुळे संरक्षित वन धोक्यात आले आहे. वसई पूर्वेच्या भागात तुंगारेश्वर अभयारण्य परिसर आहे. हा परिसर निसर्ग सौंदर्य, विविध प्रकारचे पशु पक्षी, विविध प्रजातीचे वृक्ष याने बहरलेला परिसर होता. मात्र मागील काही वर्षांपासून या जंगलात झाडांची कत्तल, शिकारी, अतिक्रमण, अनधिकृत बांधकामे यामुळे हे अभयारण्य धोक्यात आले आहे.या संरक्षित वनाचे संवर्धन व्हावे व येथील वन्यजीवांचे अस्तित्व टिकून राहावे यासाठी वन्यजीव अभयारण्य व राष्ट्रीय उद्यानांच्या सभोवताल क्षेत्र इको सेन्सेटीव्ह झोन घोषित करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. त्यानुसार वसईतील तुंगारेश्वर अभयारण्य परिसरसुद्धा इको सेन्सेटिव्ह झोन म्हणून जाहीर करण्यात आला होता. यात २८ गावांच्या जवळील वन क्षेत्राचा समावेश आहे. त्यानंतर येथील परिसर हा सुरक्षित राहील अशी आशा होती. मात्र या क्षेत्राच्या देखभाल व त्यांचे संवर्धन करण्याकडे वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले असल्याने मागील काही वर्षापासून तुंगारेश्वर अभयारण्याच्या हद्दीलगत इको सेन्सिटिव्ह झोनमध्ये मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करून बेकायदा बांधकामांची निर्मिती होत आहे. त्या बेकायदा बांधकामामध्ये प्रदूषण पसरविणारे कारखाने उभे राहिले आहेत. याचा परिणाम पर्यावरणावर होत आहे. तर दुसरीकडे भूमाफियांनी बेकायदा चाळी उभारल्या आहेत. या चाळींच्या वनहद्दीलगतच्या वाढत्या संख्येमुळे लोकांचा थेट वावर जंगलात होऊ लागला आहे. त्यामुळे येथील परिसर धोक्यात आला असल्याचा आरोप पर्यावरणप्रेमी मॅकेन्झी डाबरे यांनी केला आहे. संरक्षित जंगलापासून एक किमीपर्यंत बांधकाम परवानगी दिली जात नसताना सर्रास पणे बांधकामे उभी राहू लागली आहेत. २०१८ नंतर शीरसाड ते पोमण या भागात बांधकामे तयार झाली आहे. याच परिणाम वन्यजीवांच्या अधिवासावर झाला आहे. यावर कारवाई करण्यात यावी यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचे डाबरे यांनी सांगितले आहे. या संरक्षित वनाचे अस्तित्व टाकावे पर्यावरण आणि वन याबाबत तज्ञांची समिती नेमून चौकशी करावी. याशिवाय इको सेन्सिटिव्ह क्षेत्र बाधित करणाऱ्यांच्या विरोधात तातडीने कायदेशीर कारवाई अशी मागणी मॅकेन्झी डाबरे यांनी राज्याचे वनमंत्री यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. तुंगारेश्वर अभयारण्यात होत असलेले अतिक्रमण यावर कारवाई करण्याचे आदेश शासन स्तरावरून देण्यात आले आहेत. राज्याचे विभागीय वन अधिकारी (सर्व्हेक्षण व सनियंत्रण) प्रधान मुख्य वनसंरक्षक वन्यजीव श्रीनिवास पाचगावे यांनी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम मुंबई यांना याप्रकरणी आवश्यक कार्यवाही करून वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करावा अशा सूचना पत्राद्वारे केल्या आहेत. जंगलात शिकाऱ्यांचे प्रमाण वाढले असून पशू पक्ष्यांसह दुर्मिळ सागाच्या झाडांची मोठ्या प्रमाणावर शिकार होत आहे. शिकार करण्यासाठी जंगलात वारंवार आगी लावण्यात येत आहे. ते रोखण्यासाठी वनविभागाला अपयश येत आहे. दुसरीकडे भूमाफियांनी अतिक्रमण करून जंगल गिळकृत करण्यास सुरवात केली आहे. याचा फटका अभयारण्यातील पशू पक्षी आणि त्यांच्या अधिवासांवर होत. सुरवातीला या तुंगारेश्वर जंगलात मोठ्या संख्येने वन्य प्राणी व पक्षी अधिवास करीत होते. आता या कडे प्रशासन व वनविभाग यांचे दुर्लक्ष होऊ लागल्याने जंगल पट्टा नष्ट होऊन वन्य प्राण्यांचे जीव धोक्यात आले आहेत. असून अनेक दुर्मिळ प्रजांती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. तर काही प्राणी आता थेट मानवी वस्तीत सुद्धा येत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# विदर्भात मोदी, शहांच्या प्रचाराचा झंझावात, मोदींची १० एप्रिलला रामटेकला सभा

**मुंबई (प्रतिनिधी)** लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात १९ एप्रिलला विदर्भातील पाच लोकसभा मतदारसंघात मतदान होत असल्याने येथे भाजपच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या सभांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार येत्या १० एप्रिलला नरेंद्र मोदी रामटेक येथे पहिली जाहीर सभा घेणार आहेत. त्यानंतर १४ एप्रिलला दीक्षाभूमी येथे दर्शन आणि चंद्रपूर येथे जाहीर सभा प्रस्तावित आहे. तर अमित शहा यांची ५ किंवा ६ एप्रिल रोजी विदर्भात पहिली सभा होणार आहे. याशिवाय राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा आणि अन्य शीर्षस्थ नेत्यांच्या सभांचेही वेळापत्रक लवकच जाहीर होईल, अशी माहिती भाजपचे आमदार प्रवीण दरेकर यांनी मंगळवारी येथे दिली. लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची आखणी करण्यासाठी भाजपच्या निवडणूक व्यवस्थापन समितीची बैठक आज पार पडली. या बैठकीनंतर बोलताना दरेकर म्हणाले, आज महाराष्ट्राच्या व्यवस्थापन समितीची बैठक प्रभारी डॉ. दिनेश शर्मा यांच्या उपस्थितीत पार पडली. महाराष्ट्रात निवडणुकीच्या दृष्टीने व्यूहरचना काय आहे, कशा प्रकारची व्यवस्था, यंत्रणा उभी आहे. या यंत्रणेची अंमलबजावणी नेमकी कशा पद्धतीने होते आहे याचा आढावा आणि मार्गदर्शक सूचना डॉ. दिनेश शर्मा यांच्या माध्यमातून देण्यात आल्या. व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून प्रत्येकावर जबाबदारी देण्यात आली आहे. दरम्यान, खासदार उन्मेश पाटील यांच्या ठाकरे गटातील प्रवेशाबाबत बोलताना दरेकर म्हणाले की, निवडणुकीच्या रणधुमाळीत अनेकजण इच्छुक असतात. काही जण उमेदवारी मिळाली नाही तरी पक्षाच्या विचाराशी एकनिष्ठ राहून काम करतात आणि एखाद्याला निवडणूक लढवायची असेल तर अशा प्रकारची भूमिका अनेक लोक अनेक पक्षात घेताना दिसतात. तशी भूमिक उन्मेश पाटील यांची आहे का? हे लवकरच समजेल. ठाकरेंना दुर्स.यांनी टाकलेले उचलावे लागणार आहे. स्वत:कडे उमेदवार नाहीत. जे चांगले उमेदवार होते ते एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेले. उद्धव ठाकरे गटाच्या उमेदवारांवर नजर टाकली तर सर्व उमेदवार आयात करून निवडणुका लढवत आहेत, अशी टीका त्यांनी केली.

# मंत्र्यांच्या बंगल्याचे ९५ लाखाचे पाणी बिल थकीत! माहितीच्या अधिकारात माहिती उघड

**मुंबई (प्रतिनिधी)** सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुंबई इलाखा शहर विभागाने शासकीय इमारतीच्या पाणी बिलाची रक्कम कंत्राटदारच्या खिशात घातल्याचे प्रकरण ताजे असताना आता मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह त्यांच्या मंत्रिमंडळातील इतर मंत्र्यांनी २०२१ पासून सरकारी निवासस्थानातील पाण्याचे सुमारे ९५ लाख १२ हजार रुपयाचे बील थकवल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे मंत्र्यांच्या बैठका होर्णाय़ा सह्याद्री अतिथीगृहाचे तब्बल ३५ लाख ९९ हजार रुपयांचे पाण्याचे देयक भरलेले नाही. त्यामुळे सर्वसामान्यांकडून पाणीपट्टी वसूल करणारी मुंबई महानगरपालिका सरकारकडून पाण्याचे बील कधी वसूल करणार? असा प्रश्न केला जात आहे. माहिती अधिकार कार्यकर्ते शकील अहमद शेख यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह मंत्र्यांच्या बंगल्यावरील पाणी देयकाच्या थकबाकीच्या रकमेची माहिती मुंबई महानगरपालिकेकडून मिळवली आहे. थकबाकीदारांमध्ये राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे (वर्षा बंगला, नंदनवन), उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, (सागर, मेघदूत), उपमुख्यमंत्री अजित पवार (देवगिरी), मंत्री सुधीर मुनगंटीवार (पर्णकुटी), मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील (रॉयलस्टोन), मंत्री डॉ. विजयकुमार गावित (चित्रकूट), मंत्री गिरीश महाजन (सेवासदन), मंत्री गुलाबराव पाटील (जेतवन), मंत्री दीपक केसकर (रामटेक), मंत्री उदय सामंत (मुक्तागिरी) आणि सह्याद्री अतिथीगृहाचा समावेश आहे. २०२१ पासून डिसेंबर २०२३ पर्यंत या सर्व बंगल्यावरील पाण्याची एकूण थकबाकी ९५ लाख १२ हजार २३६ रुपये असून ही रक्कम मुंबई महानगरपालिकेने वसूल केलेली नाही. दरम्यान, मंत्री महोदयांच्या शासकीय निवासस्थानाच्या पाणी देयकांच्या थकबाकीची रक्कम उद्या, शुक्रवारपर्यंत मुंबई महापालिकेकडे जमा करण्यात येईल, अशी माहिती इलाखा शहर विभागाचे कार्यकारी अभियंता विद्याधर पाटसकर यांनी गुरुवारी दिली.

## मंत्री आणि पाणी देयकांची थकबाकी

| | |
|---|---|
| मुख्यमंत्री एकनाथ शिंदे (वर्षा, नंदनवन) ... | १८ लाख ४८ हजार ३५७ रुपये |
| देवेंद्र फडणवीस (मेघदूत, सागर) .... | २ लाख ७३ हजार ११८ रुपये |
| अजित पवार (देवगिरी)....... | ४ लाख ३८ हजार ८५९ रुपये |
| सुधीर मुनगंटीवार (पर्णकुटी).... | ६ लाख ५२ हजार ४९४ रुपये |
| राधाकृष्ण विखे-पाटील (रॉयलस्टोन).... | ९२ हजार ४२३ रुपये |
| विजयकुमार गावित (चित्रकुट)..... | ५ लाख १९ हजार १४० रुपये |
| गिरीश महाजन (सेवासदन) ..... | १ लाख ५६ हजार ५२८ रुपये |
| गुलाबराव पाटील (जेतवन) ...... | १ लाख १८ हजार ३२४ रुपये |
| दिपक केसरकर (रामटेक) ..... | ११ लाख ३० हजार २४२ रुपये |
| उदय सामंत (मुक्तागिरी) ..... | ६ लाख ८३ हजार ६३२ रुपये |
| सह्याद्री अतिथीगृह....... | ३५ लाख ९९ हजार ११९ रुपये |

# प्रकाश आंबेडकरांची भूमिका लोकशाही विरोधी - डॉ. भालचंद्र मुणगेकर यांचा आरोप

**मुंबई (प्रतिनिधी)** लोकसभेची सध्याची निवडणूक देशाच्या लोकशाहीच्या रक्षणासाठी अत्यंत निर्णायक आहे. ही निवडणूक भाजप विरुद्ध इंडिया आघाडी अशी नसून नव फॅसिस्ट शक्ती विरोधातील आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका हिटलरविरोधी आणि लोकशाहीच जनतेला खरा न्याय देऊ शकते अशी होती. या विचारांच्या विरोधात वंचित बहुजन आघाडीच्या प्रकाश आंबेडकर यांनी भूमिका घेतली आहे. त्यामुळे त्यांची भूमिका लोकशाही विरोधी आहे, असा आरोप काँग्रेसचे माजी राज्यसभा सदस्य डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी गुरुवारी येथे केला. महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याची प्रकाश आंबेडकरांची भूमिका दुर्दैवी असून ती भाजपला अनुकूल असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. प्रकाश आंबेडकर यांनी महाविकास आघाडीपासून अंतर राखत लोकसभा निवडणुकीत स्वबळावर उमेदवार उभे केले आहे. वंचितच्या या भूमिकेमुळे मतविभागणी होऊन त्याचा फायदा महायुतीला होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. मुणगेकर यांनी आज पत्रकार परिषदेत प्रकाश आंबेडकर यांच्यावर टीकास्त्र सोडले. तसेच प्रकाश आंबेडकर यांच्या भूमिकेमुळे बौद्ध समाजात तीव्र नाराजी असून लोकशाही, संविधान आणि स्वांतत्र्य वाचवण्यासाठी दलित, वंचित, आदिवासी, आल्पसंख्याक, महिला, मागासवर्गीय या सर्व समाज घटकांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मरण करून इंडिया आघाडीला मतदान करावे, असे आवाहनही त्यांनी केले. प्रकाश आंबेडकर यांनी सुरुवातीपासून भाजपच्या भूमिकेवर टीका केली होती. भाजप संविधान विरोधी आहे, लोकशाही विरोधी आहे अशी भूमिका ते मांडत होते. परंतु प्रत्यक्षात लढण्याची वेळ आली त्यावेळी त्यांनी भाजपला अनुकूल भूमिका घेतली. महाविकास आघाडीसोबत जागा वाटपाची चर्चा केली. परंतु शेवटी वेगळे लढण्याचा निर्णय घेतला, असे डॉ. मुणगेकर म्हणाले. वंचितला २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत ४४ लाख मते पडली होती. पण त्यात एमआयएमच्या मतांचा मोठा हिस्सा होता. विधानसभा निवडणुकीत एमआयएम सोबत नसल्याने वंचितच्या मतांमध्ये घसरण होत ही मते २१ लाखापर्यंत खाली आली. लोकसभा निवडणुकीत वंचितमुळे काँग्रेस आघाडीचा ९ जागांवर पराभव झाला तर विधानसभा निवडणुकीत १६ जागांवर पराभव झाला. परंतु वंचितमुळे भाजपच्या एकाही उमेदवाराचा पराभव झालेला नाही. यावरून वंचितची भूमिका ही भाजपला फायदेशीर अशीच ठरलेली आहे. प्रकाश आंबेडकर यांनी साततत्याने टीकात्मक विधाने करूनही काँग्रेस पक्षाने त्यांना अत्यंत सन्मानाने १७ मार्च रोजीच्या शिवाजी पार्कवरील इंडिया आघाडीच्या जाहीर सभेला निमंत्रीत केले. पण त्यासभेत त्यांनी केलेल्या विधानावरून त्यांची भूमिका साशंक आहे हे स्पष्ट झाले होते, असे डॉ. मुणगेकर यांनी सांगितले.

OWNER, PRINTER, PUBLISHER & EDITOR BY ANIL RAJARAM PAWAR PRINTED AT M/S SOMANI PRNITING PRESS, UNIT NO.04, GROUND FLOOR, N.K. INDUSTRIAL ESTATE, OFF AREY ROAD, NEAR PARVASI IND. ESTATE, GATE NO. 2, GOREGAON EAST, MUMBAI-400063, & PUBLISH AT M/81, MARIAMMA NAGAR, WORLI, DR A.B. ROAD,BEHIND NEHRU CENTRE, WORLI MUMBAI - 400018. MAHARASHTRA , Email : amtnewspaper@gmail.com, Title-Code:- MAHMAR52789 , Mob. 9867110318

मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक अनिल राजाराम पवार यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.४, ग्राउंड फ्लोअर, आरे रोड, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेट, गेट नं. २, गोरेगाव (पूर्व) मुंबई - ४०००६३ महाराष्ट्र येथून मुद्रित, एम/८१,मरिम्मा नगरए वरळी, डॉ. ए.बी. रस्ता, नेहरु सेंटरच्या मागे, वरळी,मुंबई ४०००१८, महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. मो. ९८६७११०३१८, Email : amtnewspaper@gmail.com, Title-Code:- MAHMAR52789